International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar–April- 2022

# भ्रष्टाचार — एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा.डॉ. अभय श्रीहरी लाकडे**
*फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली*
*ई—मेल* : abhaylakadek@gmail.com

**प्रस्तावना —**

भ्रष्टाचार या शब्दाचा अर्थ 'पैसे खाणे' या मर्यादित अर्थाने वापरला जातो. एवढेच नव्हे तर लाचलुचपत, अफरातफर, घोटाळा इत्यादी पर्यायी शब्द वापरुन त्याची ओळख पटवून दिली जाते. समाजातील व्यक्तिवर्तनाच्या नियंत्रणाचा एक भाग म्हणून प्रमाणक व्यवस्था असते. ही प्रमाणक व्यवस्था नियमांचे उल्लंघन करुन व्यक्ती जेव्हा समाजाच्या चाकोटीबाहेर वर्तन करते तेव्हा ते भ्रष्ट वर्तन ठरते. साधारणत: व्यक्ती स्वत:च्या फायद्याकरिता सार्वजनिक क्षेत्राचा अशा पध्दतीने वापर करतो की, त्यामुळे कायदा व सामाजिक मापदंडाचे उल्लंघन होत असते. सामाजिक नियमांना अनुसरुन वर्तन करणे, हे आवश्यक आहे. हे माहीत असतांना देखील भौतिक गरजा पूर्तीकरण्यास व्यक्ती अनैतिक मार्गाचा वापर करतो. भ्रष्टाचार या शब्दाची फोड करुन भ्रष्ट + आचार असा अर्थ आहे. समाजाची रुढ पध्दत सोडून केलेले वर्तन हे भ्रष्ट वर्तन ठरते. भ्रष्टाचार हा आज शिष्टाचार झालेला दिसून येतो आहे. बऱ्याचदा भ्रष्टाचार हा एखादा व्यक्ती स्वत:च करीत असतो. पण कधी कधी तर एखादा व्यक्ती स्वत:चे काम लवकरात लवकर करुन घेण्यास भ्रष्टाचाराचे प्रलोभन देत असतो. त्यामुळे भ्रष्टाचार करणारे व भ्रष्टाचारास प्रवृत्त करणारे हे दोघेही समाजाच्या चाकारी बाहेर वर्तन करतात.

**व्याख्या :—**

**१) इलियट आणि मेरिल (Elliot and Merill)**

''प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यक्तिगत लाभासाठी विशिष्ट कर्तव्य करण्यात कसुर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

**२) प्रभाकर मांचवे (P. Manchawe)**

कोणतेही अनैतिक वर्तन गैरवर्तन किंवा संशयात्मक आर्थिक लाभ, कोणत्याही सत्तेचा किंवा पदाचा गैरवापर कोणत्याही गरजु व्यक्तीच्या बळाचा किंवा शोषणाच्या जोरावर मिळविलेले फायदे किंवा तशाच इतर दुर्गणांचा भ्रष्टाचाराच्या संकल्पनेत समावेश होतो.

**३) भार्गव**

''स्वत: किंवा त्याचं कुटुंब किंवा इतर सामाजिक सेवकाने प्रयत्न किंवा भौतिक लाभासाठी एखादे कृत्य करणे अथवा करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.

**भ्रष्टाचाराची कारणे :—**

भ्रष्टाचाराचा मुख्य अंग पैसा आहे. परंपरागत पध्दतीत पैशाला अनुसरुन काम करीत नव्हते परंतु बदलत्या परिस्थितीतील पैसा हा सर्वेसर्वा झालेला आहे. पूर्वी भारतात पैशाला अवास्तव महत्व दिल्या जात नव्हते. मानवाच्या मुलभूत गरजा स्थानिक पातळीवरच पूर्ण होत असत. परंतु बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबरच मुलभूत गरजांसोबत इतर अनेक गरजा महत्वाच्या ठरल्या आहेत. गरजा पूर्ण करण्याकरीता आवश्यक साधनांची कमतरता शहरी, ग्रामीण भागात आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करुन आपल्या गरजा पूर्ण करण्यावर भर दिला जातो. भ्रष्टाचाराची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) चैनीच्या जीवनपध्दतीची लालसा :—**

मानव हा समाधानी कधीही नसतो. आजच्या भौतीकवादी जीवनात त्यांच्या जिवनपध्दतीत खुप मोठे बदल झालेले आहे. मानव हा आपल्या दैनंदिन जीवन जगत असताना आपल्या चैनीच्या

जीवनशैलीच्या लालसेपोटी अधिक पैसा मिळविण्याच्या प्रयत्नातून व्यक्ती भ्रष्टाचाराकडे वळतो आहे. आपल्या भौतीक सुखसोयींनी युक्त ऐषरामाचे जीवन जगण्यासाठी पैशाला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पैशाने सर्व सुख विकत घेता येते. अशी व्यक्तीची मानसिकता तयार झाली आहे. पैसा सरळ मार्गाने मिळणे शक्य नसते. म्हणून भ्रष्टाचार करुन जास्तीत जास्त पैसा मिळवून हवे ते सुख मिळविण्याची स्पर्धा सुरु आहे. करीता जणमानसात भ्रष्टाचारी मार्गाने पैसा मिळवून आपल्या भौतीक गरजा पूर्ण करण्यावर भर देतात.

**२) सामाजिक मुल्याचे अध:पतन :—**

समाजशील म्हणून जीवन जगतांना आपल्या काही गरजा पूर्तीसाठी स्वहित जोपासणे क्रमप्राप्त असते. अशातून मानव सामाजिक मापदंडाचा त्याग करतो. समाजात काही निश्चित, नियमने मुल्ये असतात. सेवा, त्याग, नैतीकता, कर्तव्य, इमानदारी या नैतिक बाबी आज मागे पडल्या आहेत. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणे, विश्वासघात करणे, काळाबाजार करणे, कृत्रीम टंचाई सार्वजनिक निधिचा गैरवापर इ. सर्व भ्रष्टाचाराला नैतिक अध:पतन हे मुख्य कारण आहे. सामाजिक दाईत्वाचे हनन झालेले आहे. त्यामुळे समाजहीत लक्षात न घेता स्वत:च्या स्वार्थापोटी मानव गैरवर्तन करतो आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी स्वरुप अधिक तिव्र बनत आहे.

**३)आर्थिक असुरक्षितता :—**

आर्थिक सुरक्षीतता प्रत्येक मानवास स्थिरता प्रदान करीत असते. म्हणून आर्थिक सुधारणा करण्याकरीता गैरकृत्याचा वापर करीत असतो. समाजामध्ये असलेली आर्थिक असुरक्षितता हे भ्रष्टाचाराचे एक महत्वाचे कारण आहे. नवनवीन कायदे व नियमांमुळे आज आपला जो दर्जा आहे. तो कायम राहीलच असे नाही. जी संधी मिळेल ती भविष्यात मिळतीलच याबाबत व्यक्तीला खात्री नाही. समाजात आपला दर्जा उच्च व्हावा. आपण श्रीमंत व्हावे. आज मिळालेली संधी सोडू नये म्हणून भ्रष्टाचार करतो. म्हणजे आज कुठेतरी असुरक्षिततेची भावना दिसून येते त्यामुळे भ्रष्ट पध्दतीने आर्थिक हित जोपासणे व त्या कृतीवर भर देऊन स्वत:चे समाधान करुन घेण्यावर भर दिले जात आहे.

**४) सामाजिक प्रतिष्ठा :—**

सामाजीक प्रतिष्ठा प्राप्त करण्याकरीता अर्थाची अत्यंत आवश्यकता आहे, असा लोकांचा समज झालेला दिसून येतो. समाज प्रतिष्ठा हवी असेल तर त्यासाठी संपत्ती व पैसा आवश्यक असते. ज्याची आर्थिक परिस्थिती चांगली तो प्रतिष्ठित, असे समीकरण झाले आहे. भ्रष्टाचारी मार्गाने अधिकाधिक पैसा मिळवून सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करता येते. असा दृष्टीकोन आज उदयास आला आहे. त्यामुळे शिक्षणासारखी शुध्द पगाराची नौकरी दुय्यम मानुन त्या व्यतिरिक्त वरचे काय मिळते अशा नौकऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करुन जास्तीत जास्त पैसा मिळवून हवे ते सुख मिळण्यासाठी जणू स्पर्धा समाजात सुरु आहे. त्यामुळे समाजात आर्थिक मापदंडे पूर्णपणे परिवर्तीत झालेली आहे. पैसे एक पैसा अशा समीकरणातून व्यक्ती कृती करीत आहे.

**५) राजकीय व्यवस्था :—**

स्वाभाविकता ज्यांच्या मदतीने निवडून आले त्यांना मदत करण्याच्या अनुषंगाने अवैध धंदे करणाऱ्यांना अभय देतात. त्यांच्याच आशिर्वादाने अवैध धंदे निर्माण करतात. तसेच निवडणूकीत जास्तीत जास्त पैसा खर्च केला जातो. पद मिळविले जाते तेव्हा पदाचा गैरवापर करुन भ्रष्ट मार्गाने निवडणूकीसाठी खर्च केलेला पैसा वसूल करण्यासाठी नियमीतपणे गैरवर्तन करतांना दिसतात.

**६) न्यायव्यवस्थेतील दिरंगाई :—**

न्याय पध्दतीने जीवन जगणे हे महत्वपूर्ण आहे. परंतु धकाधकीच्या काळात न्याय पध्दतीने जीवन जगता येत नाही. समाजात न्याय मिळविणे महाग झाले. न्यायालयीन शुल्क, वकिलांची फी सर्वसामान्यांना परवडणारी नसते. खटल्यामध्ये न्यायमुर्तीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो. तर कधी न्यायाधिकाराच्या कमतरतेमुळे लवकर न्याय मिळू शकत नाही. त्यामुळे कायद्याच्या पाळवाटेतून गुन्हेगार सुटतात. या सर्व परिस्थितीमुळे सत्याला न्याय मिळतो यावरचा लोकांचा विश्वास कमी झाला आहे. त्यामुळे न्यायालयीन व्यवस्थेचा गैरवापर करुन गुन्हेगार माणसे सजन

माणसासारखे वावरतांना दिसतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण बळावते. अशा लोकांचा आदर्श सामान्य माणूस घेऊन कृत्य करण्यास पुढे येतो.

**७) कठोर शिक्षेचा अभाव :—**

भ्रष्टाचारी व्यक्तीवर शक्यतो कार्यवाही करण्यास दिरंगाई केली जाते. कारण बऱ्याचदा गैरकृत्य सामुहीकरित्या घडून आलेला असतो. त्यात चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापासुन तर प्रथम श्रेणी अधिकाऱ्यांपर्यत सहभागी असतात. भ्रष्टाचारात सर्वांचे हात रंगले असल्यामुळे कुणी कुणावर कार्यवाही करावी? हा प्रश्न निर्माण होतो. कार्यवाही करायचीच झाली तर त्याला काही दंड करणे, चौकश्या समिती नेमणे. एका खात्यातून दुसऱ्या खात्यात बदली करणे इ. कार्यवाही केली जाते. त्यामुळे होऊन काय शिक्षा होईल, ही कल्पना भ्रष्टाचारी व्यक्तीला असते. त्यामुळे हे असे व्यक्ती राजरोसपणे भ्रष्टाचार करुन समाजात ताठमानेने वावरतांना दिसून येतात.

**८) अकार्यक्षम लाचलुचपत प्रतिबंधक खाते :—**

भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी शासनस्तरावर लाचलुचपत प्रतिबंधक खाते स्वतंत्र्यरित्या काम करित आहे. परंतु त्याद्वारेसुद्धा कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी होत नाही. कारण बरेच खटले पैसे देऊन थांबविले जातात. म्हणजेच भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी भ्रष्टाचार होतो. त्यामुळे अधिक प्रमाणात भ्रष्टाचार वाढतच जातो. त्याकरिता 'रखवालदारच जर शेत खात असेल' तर न्याय कुणाकडे मागणार हा प्रश्न पडतो. त्यामुळे सामान्य माणूस गप्प बसून मुक्क्यांचा मार सहन करीत असतो. त्यामुळे समाजात भ्रष्टाचारी माणसांना गुन्हेकरण्यास संधी प्राप्त होत असते.

**भ्रष्टाचाराचे परिणाम :—**

भ्रष्टाचाराने संपूर्ण समाजाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. भ्रष्टाचाराची समस्या हि गंभीर स्वरुपाची समस्या असून ती कर्करोगासारखी संपुर्ण भारतीय समाजाला पोखरत असल्याचे दिसून येत आहे. भ्रष्टाचाराच्या समस्येचे अत्यंत दूरगामी व विघातक परिणाम भारतीय समाजावर होत राहतील. वाढत्या भ्रष्टाचारामुळे संपुर्ण देशाची अर्थव्यवस्था पोखरली जावून आर्थिक विकास मंदावला आहे. देशात काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था निर्माण होवू लागली आहे. अवैद्य धंदे, सामाजिक विघटन, जातीयता, राजकीय अस्थैर्य इत्यादींमुळे एकूणच विकासप्रक्रियेवर परिणाम झाला आहे. भ्रष्टाचारामुळे समाजव्यवस्थेत हिंसा, अराजकता यांनी जन्म घेतला आहे. कारण भ्रष्टाचाराचा अवलंब करणारा व्यक्ती कायद्याला हाताशी धरतात. आणि आपल्या फायद्यासाठी कायद्याचा हवा तसा वापर करतात. त्यामुळे समाजातिल मुलव्यवस्था व नियमन व्यवस्था ढासळत आहे. त्यामुळे लोकांचा वाईट कृत्ये करण्याकडे अधिक कल दिसतो. भ्रष्टाचारामुळे गुन्हेगारी वाढते. पारिणामी समाजाची व राष्ट्राची अपरिमीत हानी होते.

भ्रष्टाचारी व्यवस्थेमुळे सामान्य लोकांचा विश्वास कमी झाला आहे. खाद्यपदार्थ औषधे यांच्यामध्ये भेसळ केली जात आहे. त्यामुळे लोकांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे. बांधकामात पैसे देऊन चूकीच्या निवीदा मंजूर करुन घेतल्या जातात. ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामालाही दर्जेदार कामाचे प्रमाणपत्र दिले जाते. त्याद्वारे स्वत:ला आर्थिक फायदा करुन घेत आहेत. धरणे, तलावे, पूल यांचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करीत असल्याने पावसाळ्यात कोसळतात. शासनाचा पैसा व्यर्थ जातो. त्यामुळे जिवीत व वित्तहानी होते.

भ्रष्टाचाराने एकंदरीत समाजाची आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक हानी होत आहे. त्यासोबतच अशा प्रकारचे वातावरणच निर्माण होत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणे हे आज मूल्यांमध्ये परिवर्तीत होत आहे.

**प्रतीबंधात्मक उपाययोजना**

भ्रष्टाचाराची समस्या संपुर्ण समाजाला पोखरत असुन तिला वेळीच पायबंद घालणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील प्रकारच्या उपाययोजना करता येईल ज्यामुळे भ्रष्टाचाराला रोकथाम करणे शक्य होईल —

१) प्रतिबंधात्मक उपाय २) दंडात्मक उपाय ३) सुधारात्मक उपाय

भारतात भ्रष्टाचार निमुलनार्थ काही कायदे तयार करण्यात आले. त्यात १९४७ चा भ्रष्टाचार निर्मुलन कायदा हा प्रमुख आहे. परंतु त्यामध्ये परिपुर्णत: नव्हती म्हणून पुढे १९५२ मध्ये

त्यात दुरुस्त्या करण्यात आल्या. १९८८ मध्ये भ्रष्टाचार निर्मुलनार्थ दुसरा कायदा तयार करण्यात आला.

भारताच्या संदर्भात केंद्र सरकारने जुन १९६२ मध्ये श्री. के संथानम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीचे उद्देश पुढीलप्रमाणे—

अ) लाचलुचत, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी स्वरुपाच्या कृत्यांच्या संदर्भातील खटले त्वरित निकालात काढण्यासाठी कायदे परिणामकारक होणाच्या दृष्टीने बदल सुचविणे.

ब) कायद्यामधील पळवाटा शोधुन कायद्याचा अर्ध संदिग्ध राहणार नाही, याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे.

क) समाज आणि सार्वजनिक सेवक यांच्यात उभयवृत्ती सामंजस्यपुर्ण संबंध निर्माण होणाच्या दृष्टीने उपाय सुचविणे.

ड) भ्रष्टाचारविरोधी उपाययोजना समाजाचा पाठिंबा किंवा सहकार्य मिळविणे आणि

इ) सार्वजनिक तसेच शासकीय क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये प्रमाणिकपणा एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीने उपाय सुचविणे.

**प्रतिबंधात्क उपाय :—**

भ्रष्टाचार निर्मूलनार्थ काही उपाययोजनांचा आपल्याला परामर्श करता येईल. भ्रष्टाचार प्रतिबंधात्मकतेसाठी मंत्री व वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांच्या अधिकार, कर्तव्यासंबंधीचे नियम स्पष्ट असावेत. मंत्रीजण व वरिष्ठ सनदी अधिकारी यांच्या अधिकार व कर्तव्याबाबतचे नियमामध्ये स्पष्टता असावी. तसेच विशिष्ट वर्तनाविषयी आचार संहिता निर्माण करण्यात यावी व आचार संहितेचा तक्ता दर्शनीभागामध्ये प्रदर्शीत करावा. ज्यामुळे प्रत्येकाला ते कळण्यास मदत होईल. आचार संहिता मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावे.

अ) महत्वपूर्ण पदावरील व्यक्तीने आपल्या स्थावर व जंगम मालमत्तेचे तपशील प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

ब) भेटवस्तू कोणत्याही व्यक्तिकडून स्विकारु नये.

क) दैनंदिन कार्याचा तपशील प्रदर्शीत करणे.

ड) भ्रष्टाचाराची माहिती व मदत पुरविणाऱ्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवावे.

इत्यादींमुळे भ्रष्टाचाराची तिव्रता कमी करण्यास मदत होईलच व वचक ठेवण्यास मदत मिळेल.

**दंडात्मक उपाय :—**

भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी व त्याबाबतचा न्यायनिवाडा लवकरात लवकर केल्याने भ्रष्टाचारास आळा घालण्यास मदत होईल. न्यायदानाची पध्दत सरल, सुटसुटीत असावी ज्यामुळे शिक्षेची अंमलबजावणीची प्रक्रिया सामान्य व्यक्तिला व समाजाला समजू शकेल. संथानम आयोगाने लोकपाल नियूक्त करण्याची शिफारस केली होती. काही राज्यामध्ये लोकपाल नियूक्त आहे परंतू भ्रष्टाराचार कमी करण्यास अपयशी ठरले. राष्ट्रीय स्तरावर लोकपालाच्या नियूक्ती संदर्भात विधेयकच मंजूर झालेले नाही.

भ्रष्टाचाराचे आरोप सिध्द करण्यासाठी पुरावे गोळा करण्यासाठी पोलीस यंत्रणा कार्यरत आहे. C.B.I, C.I.D ही खास विभाग अनुक्रमे केंद्र व राज्य पातळीवर काम करतात. राजकीय उच्चपदस्थांवरील व्यक्तींच्या हस्तक्षेपामुळे या विभागांनी निष्पक्षपणे काम करतांना अडचणी येतात.

**सुधारात्मक उपाय :—**

अ) नैतीक मूल्यांचा ऱ्हास हा फक्त कायद्याद्वारे कमी करता येत नाही. त्याकरीता आर्थिक विकास व चारित्र्य यावर शिक्षण प्रभावी पणे मार्गदर्शक ठरु शकेल.

ब) भ्रष्टाचाराविरोधी लोकमत तयार करण्यासाठी वृत्तपत्राची भूमीका महत्वाची आहे. भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर वृत्तपत्रे प्रकाश टाकून वाचकांच्या मध्ये भ्रष्टाचारविरोधी भावना जागृती करण्याचे काम करु शकतात.

क) शासकीय कामकाज अधिकाअधिक गोपनीय तत्वाचे पालन करतात. गोपनीयतेमुळे भ्रष्टाचार करण्यास अधिक संधी मिळते. शासकीय आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता आणल्यास भ्रष्टाचाराला आळा घालण्यास मदत मिळेल.

ड) नोकरशाही व दिरंगाई कमी करणे आवश्यक आहे. कर्मचारी आपल्या कामचूकार प्रवृत्तीने काम करतात. त्यामुळे भ्रष्टाचारास चालना देण्यास प्रोत्साहन मिळते करीता अशा कामचूकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कडक शासन करणे.

**संदर्भ**

१) काचोळे दा.धो. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या कैलाश पब्लीकेशन गोकुलवाडी औरंगाबाद प्रथमावृत्ती सप्टेंबर २००५
२) रा.ज. लोटे भारतीय समाज आव्हाने आणि समस्या पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर जून २००९
३) डॉ. दा.धो. काचोळे भारताच्या विघटनात्मक समस्या कैलाश जून १९९८
४) डॉ. मा. कि. खडसे भारतातील सामाजिक समस्या श्री मंगेश प्रकाशन रामदास पेठ नागपूर २००९
५) डॉ. संजय साळीवकर सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ रामदास पेठ नागपूर २००९
६) प्रा. डी.एल. ठोखणे, प्रा. सौ. जयश्री महाजन प्रशांत पब्लिकेशन्स पुणे २००८
७) प्रा. पी. के. कुळकर्णी भारतातील सामाजिक समस्या विद्या प्रकाशन नागपूर १९९८
८) डॉ. प्रदिप आगलावे भारतीय समाज संरचना आणि समस्या श्री. साईनाथ प्रकाश धरमपेठ नागपूर १० प्रथमावृत्ती
९) डॉ. बी.एम. कऱ्हाडे भारतीय समाज प्रश्न आणि समस्या पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर जून २००९
१०) टी. के. ओमन भारतीय समाजातील समस्या व वाद डायमंड पब्लीकेशन्स पुणे प्रथम मराठी आवृत्ती २००२